■ वर्ष : ०६ ■ अंक: ०३ ■ मुंबई, मंगळवार १० डिसेंबर २०१९ ते सोमवार १६ डिसेंबर २०१९ ■ पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 लहान मुलांमधील कॅन्सरमध्ये होतेय मोठ्या प्रमाणात वाढ

3 → झटपट न्यायाचा सापळा

GSTमध्ये मोठा बदल झाल्यास कपडे आणि जेवण महागणार ← 4

निर्भया बलात्कार प्रकरण

## दयेची याचिका दाखल होताच आरोपींना देणार फाशी



### निर्भयाच्या दोषींसाठी फास बनविण्याची तयारी सुरु

### कैदीच बनवतायेत 'फांसी का फंदा'

**पाटणा - बिहार येथील बक्सर मध्यवर्ती कारागृहात फाशीसाठी लागणाऱ्या फास बनविण्याची तयारी सुरु आहे. बक्सर कारागृहातील कैदी हा फास तयार करीत आहेत. २०१३ साली संसदेवरील हल्ल्यातील दोषी मोहम्मद अफजल गुरूला फाशी देण्याचा फास याच कारागृहातून बनविण्यात आला होता आणि नवी दिल्लीच्या तिहार तुरुंगात पाठविण्यात आले होते. यावेळी निर्भयाच्या दोषींसाठी 'फांसी का फंदा' तयार केला जात असल्याची चर्चा सुरु आहे. अशी माहिती न्यूजपोर्टलवर देण्यात आली आहे.**

गंगेच्या काठावर वसलेले बक्सर कारागृहाला फाशीचा फास बनविण्यासाठी खास ओळखले जाते. असा समज आहे की या कारागृहात अतिशय मजबूत फास तयार केला जातो. या तुरुंगात फार पूर्वीपासून फास बनविला जात आहे. बक्सर कारागृहाचे अधीक्षक विजय कुमार अरोरा म्हणतात की, 'माझ्या वरिष्ठांनी मला फाशीसाठी १० फास तयार ठेवण्यास सांगितले. हे फास कोणत्या तरुंगामधून मागितले गेले आहेत हे मला माहित नाही. मात्र, आम्ही त्यासाठी काम सुरू केले आहे.'

*तीन दिवसांपूर्वी आले निर्देश*

तीन दिवसांपूर्वी, बक्सर कारागृह अधीक्षकांना फास तयार करण्यासाठी निर्देश पाठविण्यात आले. नाव जाहीर न करता तुरूंगातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, नुकतीच गृह मंत्रालयाने राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना निर्भया दोषींची क्षमा माफी याचिका नाकारण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे याचवेळी हे निर्देश देणं म्हणजे निर्भया प्रकरणातील दोषींना फाशी देण्यात येऊ शकते असे चिन्ह दिसत आहेत'

*तीन ते चार दिवस लागतात 'फांसी का फंदा' बनवायला*

एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'अफझल गुरूचा फाशीचा फास बनविणारे काही कैदी अजूनही बक्सर कारागृहात आहेत. या कैद्यांना फास कसा बनवायचा हे चांगल्याप्रकारे माहित आहे. सात कैद्यांना तीन ते चार दिवस फास बनविण्यास वेळ लागतो.




## हैदराबाद एन्काउंटरची एसआयटीमार्फत चौकशी



**हैदराबाद: हैदराबाद येथे एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिला जाळून मारणारे ४ आरोपी पोलीस एन्काउंटरमध्ये ठार झाले. या एन्काउंटरची चौकशी करण्यासाठी तेलंगण सरकारने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. या विशेष तपास पथकाचे नेतृत्व रचकोंडाचे पोलीस आयुक्त महेश एम. भागवत हे करणार आहेत.**

रविवारी हैदराबादच्या सायबराबाद पोलिसांविरोधात हैदराबाद एन्काउंटर हे बनावट एन्काउंटर असल्याचा आरोप करत तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीनंतर तेलंगणच्या केसीआर सरकारने तपासासाठी एसआयटीची स्थापना केली आहे. या बाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, रचकोंडाचे पोलीस आयुक्त भागवत यांच्या नेतृत्वाखील तयार झालेली टीम एन्काउंटरच्या सर्व बाजूंचा बारकाईने तपास करणार आहे. एसआयटीचे सदस्य एन्काउंटरबाबत साक्षीदार कोण आहेत हे पाहणार असून उपलब्ध होणाऱ्या साक्षीदारांचा जबाब नोंदवणार आहेत. या व्यतिरिक्त एसआयटी या वादग्रस्त एन्काउंटरमध्ये सहभागी असलेल्या पोलिसांचीही चौकशी करेल. या वादग्रस्त एन्काउंटर प्रकरणी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगही सक्रिय झाला आहे. शनिवारी आयोगाच्या टीमने हैदराबादला येत चौकशी केली. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या टीमने महेबूब नगरच्या शासकीय रुग्णालयाचाही दौरा केला. इथेच एन्काउंटरमध्ये मारल्या गेलेल्या ४ आरोपींच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले होते.

### मानवाधिकार आयोगाचे चौकशीचे आदेश

वादग्रस्त हैदराबाद एन्काउंटरमध्ये ४ आरोपी मारले गेल्याची गंभीर दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने शुक्रवारी चौकशीचे आदेश दिले होते. एन्काउंटर हा चिंतेचा विषय असून याची अत्यंत सावधगिरीने चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे आयोगाने म्हटले होते. या बरोबच या चारही आरोपींचे मृतदेह ९ डिसेंबर रात्री ९ वाजेपर्यंत सुरक्षित ठेवण्यात यावेत असे आदेश तेलंगण हायकोर्टाने तेलंगण सरकारला दिले होते.

## शिवसेनेच्या हातातून सत्ता काढून घेण्यासाठी भाजपची तयारी!

**मुंबई** - महाराष्ट्रात सत्तेच्या नाट्यात भाजपला शिवसेनेने धोबीपछाड दिला. त्याचा वचपा काढण्यासाठी भाजप आता तयारीला लागला आहे. शिवसेनेचा गड असलेल्या मुंबईत गेल्या तीन दशकांमध्ये शिवसेनेचा एकछत्री अंमल आहे. प्रचंड मोठं बजेट असलेल्या मुंबई महापालिकेत आपली सत्ता कायम राहावी म्हणून शिवसेना पूर्ण शक्ती पणाला लावते. शिवसेनेचा हा गड खालसा करण्यासाठी भाजपने आता कंबर कसली असून मुंबईत झालेल्या भाजपच्या महत्त्वाच्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून भाजपने त्यासाठी मेगा प्लान तयार केल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिलीय. त्यामुळे यापुढे भाजप आणि शिवसेनेत मुंबईत जोरदार लढत होणार आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, २०२२ मुंबई मनपा भाजपा एकहाती जिंकेल यासाठी जास्त काम येथे करू. २०२२ मध्ये मुंबईत भाजपचा महापौर होईल हे आमचं टार्गेट आहे. त्यासाठी आम्ही आतापासूनच कामाला लागणार आहोत. त्यामुळेच दिवसभर आम्ही आज मुंबईवरच चर्चा केली. ३० तारखे पर्यंत मुंबई भाजपचा नवीन अध्यक्ष घोषणा होईल असंही ते म्हणाले.

महाविकास आघाडी सरकारचं खातेवाटप लांबल्याच्या घटनेवर पाटील म्हणाले, आमच्या बापाने आपला संसार नीट करावा हे सांगितलं विनाकारण दुसऱ्याच्या संसारात लक्ष नको यावर आता बोलायचे नाही. भाजपाने अजित पवार यांना क्लिनचिट दिले नाही. आताच्या सरकारच्या काळात अजित पवार यांच्याबाबत प्रतिज्ञापत्र दिलं आहे असंही त्यांनी सांगितलं. पाटील पुढे म्हणाले, १ ते ५ जानेवारी कालावधीत प्रदेश अध्यक्ष नवीन घोषणा होईल.

खडसे हे १९७८ पासून भाजपा काम करत मोठे झाले. भाजपा संघटनेत खडसे यांचा मोठा वाटा आहे. ते नेते आहेत, ते वेगळा विचार करणार नाहीत. खडसे यांच्याशी दीर्घ चर्चा झाली. त्यांना आश्वासन दिले. जे चुकीचे झाले त्यांवर कारवाई करू असं त्यांना आश्वासन दिलं असंही त्यांनी सांगितलं.

## दिल्लीत अग्नितांडव

### धान्य बाजार परिसरात लागलेल्या भीषण आगीत ४३ जणांचा मृत्यु

### 'बाबा फॅक्टरीत आग लागली आहे, आम्हाला वाचवा' मुलाचा तो फोन ठरला शेवटचा



'बाबा खूप भीती वाटत आहे. कारखान्यात आग लागली आहे. बाहेर पडणं कठीण वाटत आहे. आम्हाला वाचवा'. आगीत अडकलेल्या मुलाने केलेला तो फोन वडिलांसाठी शेवटचा ठरला. हा त्या दोघांमधील शेवटचा संवाद होता. वडिलांनी 'चिंता करु नकोस, देवावर विश्वास ठेव' असं सांगितलं. मात्र काही वेळाने फोन कट झालाष्टवडील हॅलो हॅलो बोलत होते पण समोरुन कोणीही उत्तर देत नव्हतं. उत्तर दिल्लीच्या अनाज मंडी भागातील बेकायदा कारखाने असलेल्या एका चार मजली इमारतीला रविवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत ४३ कामगारांचा मृत्यू झाला.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## नागरिकत्व दुरुस्ती विधेयक मांडण्याच्या बाजूने शिवसेनेचं मतदान




**नवी दिल्ली: केंद्र सरकारने लोकसभेत आणलेल्या नागरिकत्व दुरुस्ती विधेयक मांडण्याच्या बाजूने शिवसेनेने मतदान केलं आहे. या विधेयकातील काही तरतूदींना शिवसेनेचा आक्षेप असतानाही विधेयक मांडण्याच्या बाजूने शिवसेनेने मतदान केलं असून प्रत्यक्ष विधेयकाला मंजुरी देताना शिवसेना काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.**

### नागरिकत्व विधेयकात नेमके काय आहे?

नागरिकत्व संशोधन विधेयकाअंतर्गत १९५५ च्या नागरिकत्वाच्या कायद्यात बदल करण्याचे प्रस्तावित आहे. या अंतर्गत पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानातून भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ईसाई शरणार्थींना नागरिकत्व देण्याचा प्रस्ताव आहे. एक वर्ष ते ६ वर्षे जे शरणार्थी भारतात राहतात त्यांना नागरिकत्व देण्याचे प्रस्तावित आहे. सध्या भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी भारतात ११ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला सोडचिठ्ठी देत केंद्राच्या सत्तेतून बाहेर पडल्यानंतर शिवसेनेने पहिल्यांदाच एनडीएच्या बाजूने मतदान केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी लोकसभेत हे विधेयक मांडल. शहा यांनी विधेयक मांडतानाच विरोधकांनी एकच गदारोळ केला. त्यामुळे संसदेचं वातावरण तापलं होतं. त्यापूर्वी हे विधेयक लोकसभेत मांडण्यासाठी मतदान घेण्यात आलं.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## ३१ डिसेंबरपर्यंत हे काम केलं नाहीत तर तुमचं पॅन कार्ड ठरेल बेकायदेशीर

**नवी दिल्ली - इनकम टॅक्स विभागाने पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक करण्यासाठीची डेडलाइन वाढवून आता ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतची मुदत दिली आहे. हे काम आता ऑनलाइन किंवा SMS च्या माध्यमातूनही करता येईल. पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक करण्याची ही सातवी संधी आहे.**



### PAN कार्ड होईल अवैध

पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक केलं नसेल तर सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस या विभागातर्फे तुमचं पॅन कार्ड अवैध ठरवण्यात येईल. असं असेल तर त्या व्यक्तीने पॅनकार्डसाठी अर्जच केलेला नाही, असंच गृहित ठरलं जाईल, असं इनकम टॅक्स विभागाने म्हटलं आहे

### फायनान्स बिलमध्ये काय म्हटलंय ?

फायनान्स बिलनुसार, डेडलाइन संपल्यानंतर आधार कार्डला लिंक न केलेलं पॅन कार्ड वापरण्यायोग्य राहणार नाही. त्यामुळेच हे टाळायचं असेल तर लवकरात लवकर पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक करण्याचं काम लवकरात लवकर करा. आत्ताच्या नियमांनुसार, तुम्ही पॅनकार्डच्या जागी आधार कार्डचा नंबर देऊ शकता. पण त्यासाठी दोन्ही कार्ड लिंक करणं आवश्यक आहे.

### कशी लिंक कराल कार्ड?

तुम्ही तुमचं पॅनकार्ड आणि आधार कार्ड इनकम टॅक्स इ फायलिंग पोर्टलच्या माध्यमातून किंवा SMS च्या माध्यमातून लिंक करू शकता. इनकम टॅक्सच्या ई फायलिंग पोर्टलवर लिंक आधार नावाचा एक सेक्शन आहे. इथे तुम्हाला तुमचा पॅन आणि आधार नंबर टाकायचा आहे. यानंतर OTP येईल. त्याच्या मदतीने तुम्ही हे काम करू शकता.

दुसऱ्या पर्यायात तुम्ही ५६७६७८ किंवा ५६१६१ या नंबरवर SMS करू शकता. यासाठी UIDPAN< १० डिजिट पॅन नंबर टाकून दिलेल्या नंबरवर पाठवावं लागेल. पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंक करताना, दोन्ही डॉक्युमेंटसवर तुमचं नाव, लिंग आणि जन्मतारीख सारखी असली पाहिजे.

# 'नवीमुंबई पालिका' आता महाविकासआघाडीच्या रडारवर

## सेनेनं आखला प्लॅन!

**मुंबई :** राज्याची सत्ता ताब्यात घेतल्यानंतर आता नवी मुंबई महापालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी महाविकास आघाडी सरसावली आहे. मागील अनेक वर्षापासूनच शिवसेनेचे स्वप्न पूर्ण



करण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी कंबर कसली आहे. त्याला कारण ही तसेच आहेत. बाळासाहेबांच्या मुशीत वाढलेले माजी मंत्री गणेश नाईक यांनी शिवसेनेला रामराम केल्यानंतर शरद पवारांच्या विश्वासातले मानले गेले. मोदींच्या लाटेत ही नाईकांनी महापालिकेची सत्ता अबाधित ठेऊन राष्ट्रवादीची इज्जत शाबूत ठेवली. मात्र, नाईकांनी भाजप प्रवेश केल्याने राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेली शेवटची महापालिका ही निसटली. तर दुसरीकडे नाईकांच्या बावखळेश्वर मंदिर जमीनदोस्त करण्यासाठी शिवसेनेने खतपाणी घातल्याने नाईकांनी माथाडी मेळाव्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे येणार असल्याने त्या कार्यक्रमाला न जाणं पसंद केलं. इथेच माशी शिंकली आणि नाईकांची बेलापूरची उमेदवारी कापली गेली. आता कोणत्या ही परिस्थितीत नाईकांची सत्ता खालसा करण्यासाठी महाविकास आघाडीची यंत्रणा कामाला लागली आहे.

मोदींच्या लाटेत पुणे, पिंपरी चिंचवड सारख्या राष्ट्रवादीच्या महापालिका वाहून गेल्या मात्र नाईकांनी आपली महापालिकेत एक हाती सत्ता आणली. हे सर्व शक्य केलेल्या विकास कामांमुळेच झालं असल्याचं सत्ताधाऱ्यांच म्हणणं आहे.सध्या नाईकांना कधी नव्हे एवढा भाजपमधील अंतर्गत गटबाजीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, राज्याचं राजकारणातलं चित्र बदल्यामुळे अनेक नेते परतीच्या वाटेवर आहे. आता नवी मुंबईत काय राजकीय नाट्य घडतं हे पाहण्याचं ठरणार आहे.

# एमटीएनएल'चे ८७ तर 'बीएसएनएल'चे ७५ टक्के कर्मचारी स्वेच्छानिवृत्तीसाठी इच्छुक!

**मुंबई : आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेल्या 'महानगर टेलिफोन निगम' तसेच 'भारत संचार निगम' या दोन्ही सरकारी उपक्रमांना लागू केलेल्या स्वेच्छानिवृत्ती योजनेला जोरदार प्रतिसाद मिळाला आहे. स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी 'एमटीएनएल'मधील ८७ टक्के, तर 'बीएसएनएल'मधील ७५ टक्के कर्मचारी इच्छुक असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

हे दोन्ही सरकारी उपक्रम बंद करण्याचा केंद्र शासनाचा हेतू नसून स्वेच्छानिवृत्ती योजना जाहीर करून कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणारा खर्च कमी करण्याचा प्रयत्न





असल्याचे दूरसंचार मंत्रालयाने स्पष्ट केले होते. त्यानुसार एमटीएनएलसाठी ही योजना ४ नोव्हेंबरपासून लागू करण्यात आली. त्याची मुदत ३ डिसेंबर रोजी संपुष्टात आली. 'बीएसएनल' कर्मचाऱ्यांना १ ते ३० नोव्हेंबर या काळात स्वेच्छानिवृत्ती योजनेत दाखल होता आले.

वयाची ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयोगटातील कर्मचाऱ्यांना ही योजना लागू करण्यात येणार आहे. या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानापोटी मिळणाऱ्या रकमेत २५ टक्के अधिक लाभ मिळणार आहे. हा लाभ रोखीस्वरूपात एका टप्प्यात किंवा पाच हप्त्यात मिळणार आहे. शिल्लक राहिलेल्या सेवेच्या वर्षांतील वेतनाच्या १२५ टक्के (निवृत्तिवेतन वगळून) सानुग्रह अनुदान मिळणार आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे ५६ वर्षे वय असेल त्यांना शिल्लक राहिलेल्या चार वर्षांचे वेतन किंवा ४० महिन्यांचे वेतन मिळणार आहे. रजा व पेन्शनबाबतही लागू असलेले भत्ते स्वेच्छानिवृत्ती योजनेत मिळणार आहेत.

स्वेच्छानिवृत्ती योजना जारी झाल्यानंतर बहुधा हे उपक्रम बंद करण्याच्या दिशेने हालचाली होण्याची शक्यता आहे. मात्र बीएसएनएलला 'फोर जी स्पेक्ट्रम'चा परवाना तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठीही निधी दिला जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दूरसंचार विभागाकडून अशा पद्धतीने सक्षमीकरणाचा आव आणला जात असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संदिग्धता निर्माण झाली आहे. एमटीएनएलच्या दिल्ली व मुंबईतील कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांचे वेतन अद्याप मिळालेले नाही. गेल्या नोव्हेंबर महिन्यापासून एमटीएनएल कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा सुरू झालेला तिढा अद्याप सुटलेला नाही.

# लहान मुलांमधील कॅन्सरमध्ये होतेय मोठ्या प्रमाणात वाढ

**मुंबई:** मोठ्यांमधील कॅन्सरचे निदान करण्यासाठी डॉक्टरांकडे त्वरित धाव घेतली जाते. मात्र, लहान मुलांमधील कॅन्सरचे निदान उशिरा झाल्यामुळे त्यांना पुढील वैद्यकीय उपचार मिळण्यास उशीर होतो. टाटा कॅन्सर रुग्णालयाने देशात वेगेवगळ्या ठिकाणी सुरू केलेल्या उपचार केंद्रांमध्ये आतापर्यंत साडेतीन हजार लहान मुलांना उपचार दिले आहेत. गुवाहाटी, वाराणसी आणि विशाखापट्टणम या ठिकाणी लहान मुलांसाठी सुरू केलेल्या कॅन्सर उपचार केंद्रांमुळे मुंबईतल्या टाटा रुग्णालयावर वैद्यकीय उपचारांचा भार येणार नाही, या मुलांना त्याच ठिकाणी वैद्यकीय उपचार मिळणे शक्य होणार आहे. येत्या दोन वर्षांत खारघर येथील केंद्राचाही झपाट्याने विस्तार करण्यात येणार आहे. देशाच्या विविध ठिकाणची केंद्रे सक्रिय झाली की त्यानंतर प्रत्येक वर्षी साडेपाच हजार लहान कॅन्सर झालेल्या मुलांना वैद्यकीय उपचार मिळू शकतील, असा विश्वास टाटा रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केला.




लहान मुलांमध्ये ब्लड कॅन्सर आणि ब्रेन ट्युमरच्या प्रकारातील कॅन्सरचे प्रमाण वाढते आहे. ताप येणे, भूक न लागणे, उलट्या होणे, डोकेदुखी, तीव्र थकवा ही लक्षणे तीन महिन्यांहून अधिक काळ दिसत राहिली तर त्यासाठी कॅन्सरच्या चाचण्या त्वरित करून घेणे गरजेचे आहे. शून्य ते १५ वर्षांपर्यंतच्या मुलांना कॅन्सर होऊ शकतो, हे अनेकदा मान्यच केले जात नाही. त्यामुळे मुलांमधील कॅन्सरचे निदान उशिरा होते. मुलांमधील कॅन्सर हा मोठ्यांच्या तुलनेमध्ये जलद बरा होऊ शकतो, याकडे टाटा कॅन्सर रुग्णालयाचे संचालक (अॅकेडेमिक्स) डॉ. श्रीपाद बनावली यांनी लक्ष वेधले. मुंबईच्या रुग्णालयांवर येणारा भार कमी करण्यासाठी आता टाटा रुग्णालयाने देशातील इतर शहरांमध्येही विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. वाराणसीमध्ये यावर्षी कॅन्सर असलेल्या पाचशे बालरुग्णांची नोंद झाली आहे, त्यांना यापूर्वी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय उपचार मिळाले नव्हते. त्यामुळे प्रत्येक लहान मुलांना मुंबईपर्यंत आणण्याची गरज यापुढे लागणार नाही, मुंबई इतकेच प्रगत वैद्यकीय उपचार त्या-त्या ठिकाणी देण्यात येतील.

### *इम्युनथेरपीचा प्रभावी वापर*

कॅन्सर झाल्यानंतर रोगप्रतिकारशक्ती कमी होते, त्यामुळे मुलांचा कॅन्सर बरा करण्याच्या टप्प्यांमध्ये मुलांमधील कुपोषण हे आव्हान आहे. लहान मुलांमधील कॅन्सरवर उपचार करताना रुग्णालयामध्ये आता इम्युनथेरपीचा वापर प्रभावीरित्या केला जात आहे. यामध्ये मुलांमध्ये कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात. लहान मुलांवर विविध प्रकारच्या औषधांचा वापर सातत्याने केला जात नाही. आता उपलब्ध असलेल्या औषधांच्या प्रभावी वापरामुळे कॅन्सरवर मात करणे शक्य झाले आहे. पहिल्या पाच वर्षांमध्ये कॅन्सर पुन्हा उद्भवला नाही तर मूल कॅन्सरमुक्त झाल्याचे वैद्यकीय निदान करण्यात येते.

# नियम मोडून विद्यार्थ्यांची वाहतूक सुरूच

वाहनात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी, नियमबाह्य़ रचना अशी शालेय विद्यार्थ्यांची अनधिकृत वाहतूक सर्रास सुरू आहे. वाहतूक नियमन विभागाने अशा वाहनांवर कारवाई सुरू केली असली तरी त्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचा आक्षेप घेण्यात येत आहे.

विद्यार्थी वाहतुकीचा विषय



गेले अनेक वर्षे गाजत आहे. नियम, कायदे झाले तरीही वाहनांमध्ये कोंबलेले विद्यार्थी, विद्यार्थ्यांना घेऊन धावणाऱ्या जुन्या गाडय़ा सर्रास दिसतात. छोटय़ा गाडय़ांमध्ये अगदी १२ वर्षांवरील १५-१६ विद्यार्थीही बसवण्यात येतात. नियमानुसार या गाडय़ांच्या नोंदणी क्रमांक पाटय़ा (नंबर प्लेट) पिवळ्या रंगात असणे आवश्यक आहे. मात्र तो नियमही सर्रास धुडकावला जातो. गाडय़ांचा रंगही पिवळा असणे अपेक्षित आहे. मात्र अनेक साध्या खासगी गाडय़ांतून विद्यार्थ्यांची व्यावसायिक पातळीवर ने-आण करण्यात येते. सध्या वाहतूक नियमन विभागाने या गाडय़ांवर कारवाई करण्यास प्रारंभ केला आहे. आतापर्यंत साधारण ३० गाडय़ांना दंड करण्यात आला आहे. मात्र ही कारवाई पुरेशी नसल्याचा आक्षेप घेण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांची अनधिकृत वाहतूक करणाऱ्या ३० वाहनांना दंड ही संख्या खूप कमी आहे. एकाच भागातील शंभरहून अधिक गाडय़ा आम्हाला माहिती आहेत. या वाहनचालकांना दंड करून सोडून देण्यात येते. मात्र, त्यांचे परवाने रद्द करण्यात येत नाहीत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नियमबाह्य़ वाहनांवर कारवाई होणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही परिस्थितीत फरक पडलेला नाही.

# पोलिस रुग्णालयाला शौचालयाची प्रतीक्षाच

■ *अस्वच्छतेमुळे रुग्णांना संसर्ग होण्याची भीती* ■ *रुग्णालयात अनेकदा औषधांचाही तुटवडा*

**मुंबई** - सार्वजनिक शौचालयांच्या अभावी बंदोबस्ताच्या ठिकाणी पोलिसांना कुचंबणा सहन करावी लागतेच, पण नागपाड्यातील पोलिस रुग्णालयामध्येही पोलिसांसह त्यांच्या कुटुंबीयांनाही याच कुचंबणेला सामोरे जावे लागत आहे. मागील पाच महिन्यांपासून दुरुस्ती सुरू असल्याने १०८ खाटांच्या या रुग्णालयात महिलांसाठी केवळ एकच स्वच्छतागृह उपलब्ध आहे. याच शौचालयाचा वापर महिला रुग्ण, परिचारिका तसेच रुग्णांचे नातेवाईकही करतात. दुर्गंधीचे आगार झालेल्या या शौचालयामुळे इतर रुग्णांना संसर्ग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलिसांना सहकुटुंब वैद्यकीय उपचार घेता यावेत, यासाठी नागपाडा पोलिस रुग्णालयात वैद्यकीय सुविधा देण्यात येतात. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील पीडित मुली तसेच महिलांचीही वैद्यकीय तपासणीही या रुग्णालयात करण्यात येते. मात्र अपुऱ्या शौचालयांमुळे या सगळ्या महिला रुग्णांना मागील कित्येक महिन्यांपासून त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात रुग्णालय प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही त्याबाबत



कोणतेही ठोस उत्तर दिले जात नाही. या रुग्णालयात अनेकदा औषधांचा तुटवडा असतो, तरीही रुग्ण विनातक्रार येथे उपचार सुरू ठेवतात. मात्र शौचालयच नसेल, तर येथे उपचार कसे घेणार, असा प्रश्न येथील महिला रुग्णांनी उपस्थित केला आहे.

रुग्णालयाच्या अनेक भिंतीची डागडुजी बाकी आहे. त्यासाठी निधी मंजूर केला जातो, मात्र प्रत्यक्षात डागडुजी होत नाही, असा आरोपही येथील कर्मचाऱ्यांनी केला आहे.

रुग्णालयामध्ये संसर्ग नियंत्रणात ठेवणे हे रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असले, तरीही प्रत्यक्षात रुग्णालयामधील अवस्था भीषण आहे. रुग्णालयाचे नूतनीकरण आणि दुरुस्ती या दोन्ही पातळ्यांवर काम सुरू असल्यामुळे नायगाव येथील रुग्णालयामध्ये रुग्णांना स्थलांतरित करण्याचा विचार सुरू आहे. मात्र यासंदर्भात वरिष्ठांची संमती मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण होईल, असे रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले.

### सुरक्षेचा प्रश्न

येथे महिलांसाठी उपलब्ध असलेल्या शौचालयामध्ये सुरक्षेचा प्रश्नही वारंवार निर्माण होतो. रुग्णालयामध्ये ठिकठिकाणी बांधकाम सुरू असल्यामुळे या शौचालयाचा वापर हा महिलांसाठी सुरक्षित राहिलेला नाही. दुर्गंधी आणि पाण्यामुळे घसरून पडणे, डोक्याला लागणे असेही प्रकार यापूर्वी घडलेले आहेत.

### परिचारिकांचेही हाल

परिचारिकांच्या चेंजिग रूमला लागून स्वच्छ व सुरक्षित शौचालय असणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात मात्र याठिकाणी त्याची उपलब्धता नाही. त्यामुळे परिचारिका, रुग्ण आणि त्याचे कुटुंबीय या सगळ्यांसाठी एकच शौचालय वापरण्यात येते. स्वयंपाकघरामधील सामायिक बेसिनमध्ये डबे धुणे, तोंड धुणे हेदेखील येथेच उरकले जाते.

# मुंबईत मद्यधुंद कार चालकाच्या धडकेत तरुणीचा नाहक बळी

**मुंबई :** मुंबईच्या चुनाभट्टीत कारच्या धडकेत एका तरुणीला आपला जीव गमावावा लागला आहे. काल रात्री सव्वानऊ वाजता एका भरधाव चार चाकीने वीस वर्षीय अर्चना पार्टी या



तरुणीला उडवलं. चार चाकीमधले चारही तरुण मद्यधुंद अवस्थेत होते. गाडीवरचे नियंत्रण सुटल्याने चालकाने रस्त्यातून चालणाऱ्या तीन तरुणींच्या अंगावर गाडी घातली. त्यापैकी एका तरुणीचा जागीच मृत्यू झाला.

अपघात झाल्यानंतर चालकाने गाडी सोडून पळ काढला. मात्र, स्थानिकांनी इतर दोघांना पकडून स्थानिक पोलिसांच्या ताब्यात दिलं. यानंतर मृत्युमुखी पडलेल्या तरुणीच्या संतप्त नातेवाईकांनी चुनाभट्टी पोलीस स्टेशनसमोर आंदोलन सुरू केलं. काहीही चूक नसताना एका २० वर्षांच्याया तरुणीला आपला जीव गमवावा लागला.

# स्थगितीनंतर आरेमध्ये काम सुरू?

**मुंबई:** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आरेतील मेट्रो कारशेडच्या कामाला स्थगिती दिली मात्र आरेतील या परिसरात दिवसरात्र खणण्याचे काम सुरूच आहे. प्रजापूर पाडा येथे रॅम्प बनवण्याच्या कामाने दिवसा आणि रात्रीही वेग घेतला असून सातत्याने जमिनीच्या पोटात यंत्र शिरण्याचा आवाज येत असल्याचे स्थानिक सांगतात. या कामामुळे त्यांच्या घरांना हादरेही बसत आहेत. कारशेडच्या कामाला स्थगिती दिल्यानंतर कारशेडमध्ये जाण्यासाठी रॅम्पचे काम नेमके कशासाठी असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

आरेमधील मेट्रो कारशेडच्या कामाला स्थगिती दिली तरीही आरेतील जमीन नष्ट करण्याचे काम अजूनही थांबलेले नाही. एमएमआरडीएचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्र्यांनी कारशेडला स्थगिती दिली आहे. तरीही रॅम्पचे काम मात्र पुढे रेटण्यात येत आहे. यासंदर्भात प्रजापूर पाडा येथील नागरिक मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात येते. या कामामुळे या प्रजापूर पाडा येथील आदिवासींच्या घरांना तडे गेले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून या कामाचा वेग आणि आवाज प्रचंड वाढला असून रात्रीचाही सातत्याने ड्रिलिंगचा आवाज येत असल्याचे स्थानिक आशा भोये यांनी सांगितले.

# आता नवी मुंबई ते मुंब्रा प्रवास होणार जलद

**मुंबई :** ठाणे-बेलापूर ते राष्ट्रीय महामार्ग-४, अर्थात मुंब्रा बायपास रस्ता जोडण्यासाठी पारसिक डोंगरातून बोगदा खोदून नवीन रस्ता तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) सुरू करण्यात आले आहे. १.८ किमीच्या या बोगद्यापैकी आत्तापर्यंत १०० मीटरचे काम पूर्ण करण्यात आले आहे. काम वेगाने सुरू असून या बोगद्यामुळे नवी मुंबई ते मुंब्रा या प्रवासात शीळफाटा ते महापे रोडचा वळसा टळणार असल्याने प्रवाशांना कमी वेळेत प्रवास करता येणार आहे. यामुळे प्रवाशांची अर्ध्या तासाची बचत होणार आहे.



या भुयारी रस्त्याचा जास्त फायदा कल्याण आणि नवी मुंबई परिसरातील रहिवाशांना होणार आहे. सध्या कल्याण ते ऐरोलीत पोहोचण्यासाठी १ तास १५ मिनिटे लागतात. भुयारीकरण झाल्यावर अवघ्या पाऊण तासात हे अंतर पार करता येणार आहे. यामुळे नवी मुंबईतून प्रवासी थेट रबाळे येथे मुंब्रा बायपासला पोहोचू शकणार आहेत.

नवी मुंबईतील रबाळे, ऐरोली येथून कल्याण-डोंबिवलीच्या दिशेने प्रवास करताना प्रवाशांना शीळफाटा-महापे रस्त्याचे वळण घेऊन प्रवास करावा लागतो. तसेच बेलापूर-ठाणे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनांना कळवा परिसरातील रेल्वे उड्डाणपूल आणि कळव्यातील खाडी पुलावरील कोंडीचा सामना करावा लागतो. हे अडथळे दूर करण्यासाठी ठाणे-बेलापूर रस्त्यावरून प्रवास करणाड्ढया वाहनांना थेट मुंब्रा बायपास महामार्गावर येण्यासाठी पारसिक बोगदा खोदून एमएमआरडीएमार्फत जोडरस्ता तयार करण्यात येत आहे.

पारसिक डोंगरातून बोगदा खोदून नवीन रस्ता तयार करण्याच्या कामाला आता सुरुवात करण्यात आली आहे. १.८ किमी अंतराच्या या बोगद्याच्या कामापैकी आत्तापर्यंत १०० मीटरचे काम पूर्ण झाले आहे. तसेच डिसेंबर २०२० पर्यंत भुयारी रस्त्याचे काम पूर्ण होणार असल्याचे एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त संजय खंदारे यांनी सांगितले.

### ऐरोली ते कटई नाकादरम्यान उन्नत मार्गिका

मुंबईतून बदलापूरदरम्यान प्रवास करणाऱ्यांचाही प्रवास सुसह्य होणार आहे. २०२१ सालापासून मुंबईहून बदलापूरदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा तब्बल एक तास वाचणार आहे. सध्या मुंबई ते बदलापूरदरम्यान रस्त्यावरून प्रवास करताना तब्बल दोन तास लागतात. लवकरच हा प्रवास १ तास १३ मिनिटांमध्ये होणार आहे. मुंबई आणि बदलापूरचे अंतर कमी करण्यासाठी एमएमआरडीए उन्नत मार्ग (एलिवेटेड) तयार करीत आहे.

# परदेशी कांदा विकू देणार नाही; मराठा क्रांती मोर्चाचा इशारा

**मुंबई :** शेतमाल आणि उत्पन्न याचा ताळमेळ बसत नाही. कांद्याचे भाव वाढल्याने ओरड होत आहे, पण शेतकऱ्यांना न्याय कधी मिळणार, याचा विचार कोणीही करत नाही. सरकारचे हे आयात धोरण चुकीचे असून, परदेशी कांदा विकू देणार नाही, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाने शनिवारी पत्रकार परिषदेत दिला.

कोल्हापूर जिल्हा समन्वयक दिलीप पाटील, संतोष गव्हाणे पाटील, प्रवीण पाटील, विवेकानंद बाबर, रूपेश मांजरेकर, महेश राणे आदी या पत्रकार परिषदेस उपस्थित होते. दिलीप पाटील म्हणाले की, 'सरकारचा कांदा आयात करण्याचा विचार आहे. १५ दिवसांत कांदा आयात केला जाईल. जानेवारीत परदेशी कांदा राज्यात आल्यास शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव कोण देणार? सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कांदा शेतकड्ढयांच्या आर्थिक संकटात वाढ होईल. त्यामुळे परदेशातून आयात केलेला कांदा विकू देणार नाही, असे ते म्हणाले.

----------(पृष्ठ १ वरुन)----------

# दिल्लीत अग्नितांडव

या कारखान्यात काम करणाऱ्या मोहम्मद इम्रान याने मुरादाबाद येथे राहणाऱ्या आपल्या वडिलांना केलेल्या फोन शेवटचा फोन ठरला. इमारतीला लागलेल्या आगीत त्याचाही मृत्यू झाला. आगीतील धुरात गुदमरुन त्याचा मृत्यू झाला. इम्रानचा छोटा भाऊ आणि चुलत भाऊदेखील आगीत मृत्यूमुखी पावले.

इम्रानचे नातेवाईक मोहम्मद जुबेर यांनी सांगितलं की, हे सर्वजण दिल्लीमधील भजनपुरा येथे राहतात. त्यांना रविवारी सकाळी इम्रानचे वडील मोहम्मद जलील अहमद यांचा फोन आला होता. त्यांनी पहाटे साडे चार वाजण्याच्या सुमारास इम्रानचा फोन आला होता असं सांगितलं.

इतक्या सकाळी मुलाचा फोन आल्याने जलील अहमद घाबरले होते. त्यांनी फोन उचलला तर मुलाने कारखान्यात आग लागली असल्याचं सांगितलं. आग वाढत चालली असून, वाचणं कठीण वाटत आहे. काहीही करुन आम्हाला वाचवा असं इम्रान पलीकडून सांगत होता. इथे जलील मुलाला देवावर विश्वास ठेवा, पोलिसांना फोन करा असं सागंत होते तितक्यात फोन कट झाला. यानंतर जलील अमहद यांना अनेक फोन केले, पण इम्रानने उत्तर दिलं नाही. त्यांनी दिवस उजाडेपर्यंत वाट पाहू असं ठरवलं.

आग इतकी मोठी असेल याचा त्यांना अंदाज नव्हता. जुबेर यांनी सांगितल्यानुसार, त्यांनी सकाळी पुन्हा आम्हाला फोन करुन कारखान्यात काय परिस्थिती आहे जाऊन पाहण्यास सांगितलं. तिथे गेल्यानंतर ती परिस्थिती पाहून आम्हाला धक्काच बसला. 'इम्रान जवळपास गेल्या पाच वर्षांपासून तिथे काम करत होता. त्याने आपला भाऊ इकराम यालाही तिथे बोलावून घेतलं होतं. इकरामसोबत दोन चुलत भाऊदेखील येथे कामाला आले होते. आगीत इम्रान, इकराम आणि दोन चुलत भावांपैकी एकाचा मृत्यू झाला,' अशी माहिती जुबेर यांनी दिली आहे.

इम्रानला तीन तर इकरामला दोन मुलं आहेत. मुरादाबाद येथे त्यांचं सगळं कुटुंब राहतं. कामातून वेळ मिळाला की सुट्टी घेऊन ते घरी जात असत आणि पैसे देत असत असं जुबेर यांनी सांगितलं आहे.

# नागरिकत्व दुरुस्ती विधेयक मांडण्याच्या बाजूने शिवसेनेचं मतदान

त्याला २९३ खासदारांनी पाठिंबा दिला. तर विधेयक मांडण्याच्या विरोधात ८२ मतं पडली. सध्या लोकसभेत या विधेयकावर चर्चा सुरू असून सत्ताधाऱ्यांकडून विधेयकाचं महत्त्व विशद करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

हे विधेयक अल्पसंख्याकविरोधी नसल्याचा दावा करतानाच काँग्रेसमुळेच हे विधेयक मांडण्याची वेळ आल्याचं शहा यांनी सांगितलं. काँग्रेसने धर्माच्या आधारे देशाचं विभाजन केलं. काँग्रेसने धर्माच्या आधारे देशात फूट पाडली नसती तर आज हे विधेयक आणण्याची गरजच पडली नसती, असा दावा त्यांनी केला.

## संपादकीय...

# झटपट न्यायाचा सापळा

हैदराबादमध्ये शुक्रवारी पहाटे चार संशयित आरोपींचा पोलिसांनी चकमकीत खात्मा केल्याने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका डॉक्टर तरुणीवर अत्याचार करून नंतर तिचा निर्घृण खून केल्याचा आरोप या चौघांवर होता. तो न्यायालयात सिद्ध होण्याआधीच त्यांना शिक्षा मिळूनही गेली. पहाटे आरोपींनी पोलिसांवर कसा हल्ला केला आणि पोलिसांनी त्यांना प्रत्युत्तर कसे दिले, या कहाणीत नावीन्य राहिलेले नाही.

मुंबईत चकमकींचे अशांतपर्व चालू होते, तेव्हा रोज अशा बातम्यांमधली फक्त नावे बदलत. इथे तर पोलिस प्रमुखांना वारंगळमध्ये काम करताना तीन ॲसिड हल्लेखोरांना तंतोतंत असेच गारद केल्याचा अनुभव होता. तेव्हा चकमकीच्या तपशिलापलीकडे मूलभूत प्रश्नांचा विचार करायला हवा. देशभर आज जो जल्लोष होतो आहे, पेढे वाटले जात आहेत, पोलिसांवर गुलाबाच्या पाकळ्यांचा वर्षाव होतो आहे, तो पाहून या सामान्य नागरिकांना दूषणे देणे सोपे आहे. मात्र, तपासयंत्रणा, त्या नियंत्रित करणारी नोकरशाही आणि राज्यकर्ते व न्यायप्रणाली यांच्याबद्दलचा सारा भ्रमनिरास या आक्रमक आनंदामागे लपला आहे, याची दखल सगळ्यांनी घेतली पाहिजे. गृहखात्याने शुक्रवारीच 'निर्भया' प्रकरणातील आरोपींचे दयेचे अर्ज फेटाळावेत, अशी शिफारस राष्ट्रपतींना पाठवली. देशातले वातावरण पाहता राष्ट्रपती ती वेगाने स्वीकारतील व फाशीही विनाविलंब दिली जाईल, अशी चिन्हे आहेत. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी राजस्थानात बोलताना 'अल्पवयीन मुलामुलींवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांचा दया-अर्ज करण्याचा अधिकार काढा,' असे आवाहन संसदेला केले. हा परीघ वाढवून कोणत्याही महिलेवर अत्याचार व तिची हत्या करणाऱ्या आरोपीला न्यायालयांनी फाशी ठोठविली तर 'दयेचा अर्ज' राष्ट्रपतींकडे करण्याची तरतूद असता कामा नये. मागे काही राष्ट्रपती वर्षानुवर्षे दयेच्या अर्जावर निणर्य घेत नसत. अशावेळी 'न्यायाला विलंब म्हणजे न्यायाला नकार' या विदारक अनुभवाने समाजाचा संयम संपला तर केवळ त्याला नावे ठेवून भागणार नाही. 'निर्भया'च्या हत्येनंतर देशभर अपार संताप व्यक्त झाला. लाखो तरुण मुले-मुली शांततेने रस्त्यावर उतरली. पण आज सात वर्षांनीही गुन्हेगारांना फाशी होऊ नये, याचा रोष साठत गेल्यास तो दोष समाजाला देता येणार नाही. नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये किंवा कायदा हातात घेणाऱ्या पोलिसांचे कौतुक करू नये, असे वाटत असेल तर 'घटनेद्वारे स्थापित असे' कायद्याचे राज्य नीट चालले आहे, याचा विश्वास समाजाला वाटला पाहिजे. तो आज तीळमात्र शिल्लक नाही. परवा राज्यसभेत बोलताना जया बच्चन यांनी जी भाषा व जो उद्वेग व्यक्त केला तो कायदा व घटनेच्या चौकटीत बसणारा नव्हता. मात्र, त्याचे लक्षावधी प्रतिध्वनी शुक्रवार सकाळपासून देशभर निनादत आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. सगळ्या व्यवस्थांना वळसे घालून झटपट न्यायनिवाडे दिले-घेतले जातात, तेव्हा आधी डॉन, मग संघटित क्रूर टोळ्या आणि शेवटी अराजक असा प्रवास होतो. यात एकेक व्यवस्था व यंत्रणा कचकड्याची होत संपते. त्या प्रक्रियेतही शेवटी सामान्य माणूसच चिरडला जातो. तेव्हा हा उन्माद ओसरल्यानंतर साऱ्या व्यवस्था रुळावर आणण्यासाठी काय करता येईल, याचा गंभीर विचार व्हावा. भारतात मुली व महिलांवर होणारे वाढते अत्याचार, या गुन्ह्यांमधले वाढते क्रौर्य व हिंस्रता हे केवळ कठोर कायदे व शिक्षांनी निपटून काढता येणारे गुन्हे नाहीत. एकाचवेळी अनेक शतकांत जगणाऱ्या भारतात वेगवेगळे कल्पक उपाय चिकाटीने व जोमाने योजावे लागतील. त्यासाठी, खंबीर राजकीय इच्छाशक्ती व स्त्रियांवरील अत्याचारांबाबत 'झिरो टॉलरन्स' असल्याचा संदेश थेट राष्ट्रपती-पंतप्रधानांपासून खालपर्यंत पाझरला पाहिजे. उन्नावच्या ज्या मुलीवर परवा जामिनावर सुटलेल्या बलात्कारी आरोपींनी पुन्हा हल्ला केला, तिला साधी तक्रार नोंदवण्यासाठी खेटे घालावे लागले होते. अशा मुलींच्या व त्यांच्या पालकांच्या लढ्यात आपण सोबत उभे राहिले पाहिजे, असे समाजाला वाटले तरच संतापाच्या पोटातून जन्मलेल्या आजच्या आनंदाला काही अर्थ आहे. बलात्कार व खून हे महिलांवरील अत्याचाराचे टोक असते. त्याआधीच्या असंख्य तऱ्हा समाज रोजच्या रोज आसपास अनुभवत असतो. तेथे बोलण्याची, हस्तक्षेप करण्याची, न्यायाच्या बाजूने उभे राहण्याची आणि सगळ्यांत मुख्य म्हणजे महिलांना समानतेने व आदराने वागवण्याची सवय समाजाने लावून घ्यायला हवी. तसे केले नाही तर एकीकडे संताप व दुसरीकडे आनंद या नुसत्या भावनिक लाटांमधून समाज पुढे जाणार नाही आणि 'निर्भया' मात्र पुन्हा पुन्हा संपत राहतील.



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

# कणीस पाडतंय हेल्थचा भुगा

## तुमच्या आवडत्या 'कॉर्न' चे 'महाभयंकर' दुष्परिणाम



गोष्ट अमेरिकेतली आहे पण आपल्या सर्वांना बरंच काही शिकवणारी आहे.

कोणे एके काळची नाही फक्त १० वर्षांपूर्वी घडलेली. कॉलेजचं शिक्षण संपवून पुढील आयुष्याची सोनेरी स्वप्ने बघणाऱ्या इयान चीनी आणि कर्टीस एलिस दोन युवकांच्या कानावर बातमी येते की

'त्यांची पिढी ही अमेरिकेच्या इतिहासातील एकमेव अशी पिढी असणार आहे की ज्यांचे आयुष्यमान त्यांच्या आईवडीलांपेक्षा कमी असेल आणि याचे कारण ते खात असलेल्या आहारात दडलेले आहे.'

अस्वस्थ झालेली ही मुलं बातमीतील सत्यता जाणून घेण्यासाठी एका शास्त्रज्ञाकडे जातात. तो त्या दोघांच्या केसांचे सॅम्पल तपासून सांगतो की त्यांचे केस मक्यापासून बनलेले आहेत.

त्यांना या गोष्टीचे आश्चर्य वाटते. ते म्हणतात आम्ही कुठं एवढा मका खातो ? त्यानंतर ते त्यांच्या केसात हा मका आला कुठून ? याचा शोध घ्यायला सुरुवात करतात. त्यासाठी ते स्वतः एक एकर शेतात मका उगवायचे ठरवतात.

त्यांच्या या शोधयात्रेवर आधारित डॉक्युमेंट्री म्हणजे 'किंग कॉर्न'.

सुमारे सव्वा तासाची ही डॉक्युमेंट्री आपल्याला कोपरखळ्या मारत हसवते, टोकदार प्रश्न विचारते आणि शेवटी विषण्ण करून सोडते. २००७ मध्ये आलेल्या या डॉक्युमेंट्रीने अमेरिकेत खळबळ उडवून दिली.

पुढील गोष्ट जाणून घेण्यासाठी ही डॉ क्युमेंट्री प्रत्यक्ष पहावी.

**मका घ्या मका**

तुम्ही म्हणाल की अमेरिकतल्या या गोष्टीचा आपल्याशी काय संबंध? आता थोडी आकडेवारी बघू. मका पिकवणाऱ्या देशांत भारत जगात दहाव्या क्रमांकावर आहे.

गेल्या दशकात मका भारतातील तांदूळ आणि गव्हानंतर तिसऱ्या क्रमांकाचे पीक आहे. लक्षात घ्या की ज्वारी आणि बाजरीचे उत्पादन मक्यापेक्षा कमी आहे.

लवकरच मका हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे पीक बनेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. भारतात मक्याचे उत्पादन इतर कोणत्याही धान्यापेक्षा अधिक वेगाने वाढत आहे.

तुम्ही म्हणाल, आम्ही तर कधीतरी पावसाळ्यात भुट्टा खातो त्यापलीकडे आमचा आणि मक्याचा संबध काय ?

भारतात पिकवल्या जाणाऱ्या मक्यापैकी ४९% कोंबड्यांचे खाद्य तयार करण्यासाठी वापरला जातो. १२ % पशुखाद्य बनवण्यासाठी, १३ % स्टार्च बनवण्यासाठी आणि २५ % खाण्यासाठी वापरले जाते.

खाल्ला जाणारा मकासुद्धा बहुतांश 'प्रोसेस्ड फूड' बनवण्यासाठी वापरला जातो.

**सर्वात मका सर्वेश्वरा**

आपण फक्त कधीतरी मका खातो असं वाटणाऱ्यांनी खालील यादी जरा नीट बघावी.

बेबी कॉर्न, स्वीट कॉर्न सूप, मक्याचे पॅटिस, कॉर्न फ्लेक्स, मसाला कॉर्न, मक्के की रोटी, कॉर्न पुलाव, कॉर्न चीझ बॉल्स, कॉर्न चाट, कॉर्न सॅण्डवीच, कॉर्न कबाब, कॉर्न चीझ टोस्ट, कॉर्न शेझवान फ्राईड राईस, स्वीट कॉर्न खीर आणि सगळ्यांना आवडणारे पॉप कॉन.

कोणत्याही छोट्या शहरातील रेस्टॉरंटचे मेन्यू कार्ड बघा तुम्हाला या डिशेस आढळतील. हल्लीची तरूण पिढी आठवड्यातून दोनदा तरी यातलं काहीतरी खाते. हे झालं मक्याच दृश्य रूप.

अदृश्य रूपाविषयी ऐकलं तर तुम्हाला मक्याचे खरे 'विश्वरूपदर्शन' घडेल.

घरोघरी रोज खाल्ले जाणारे ब्रेड, बिस्किट्स, कुकीज, केक, टोमॅटो सॉस, रेडी टू इट सूप्स, लहान मुलांचे आवडते जॅम, जेली, न्युट्रीशन बार, आईसक्रिम, फ्लेवर्ड योगर्ट, सॅलाड ड्रेसिंग, पिझ्झा बेस या सर्वांमध्ये कॉर्न फ्लोअर 'मक्याचे पीठ' किंवा हाय फ्रुक्टोज कॉर्न शुगर 'HFCS' 'मक्यापासून बनवलेली साखर' असते.

**HFCS – मीठा जहर**

एरीयेटेड कोल्ड ड्रिंक, एनर्जी ड्रिंक, हेल्दी म्हणून प्यायले जाणारे पॅकबंद नॅचरल फळांचे रस या सर्वात स्वीटनर म्हणून साखरेऐवजी एफ्सीएस वापरले जाते.

गेल्या ३० वर्षांत अमेरिकेतल्या लोकांचे साखर खाण्याचे प्रमाण कमी झाले आहे आणि त्याची जागा HFCS ने घेतली आहे. तरीसुद्धा अमेरिकेत गेल्या ३० वर्षात लठ्ठपणा, डायबेटीस, हृदयरोग, लिव्हरचे रोग यांचे प्रमाण वाढत आहे.

अनेक शास्त्रज्ञांच्या मते याचे कारण एफ्सीएस आहे. खरी गोष्ट ही आहे की एफ्सीएस हे साखरेपेक्षाही अधिक घातक आहे. तरीही फूड इंडस्ट्री मोठ्या प्रमाणात HFCS वापरते कारण ते साखरेपेक्षा स्वस्त आहे.

HFCS मध्ये मोठ्या प्रमाणात असणाऱ्या फ्रुक्टोजमुळे पोट पूर्ण भरले नाही अशी भावना निर्माण होते त्यामुळे अधिक खाल्ले जाते. त्यातून स्थौल्य आणि डायबेटीस वाढतो.

शरीरामध्ये मोठ्या प्रमाणात गेलेले फ्रूक्टोज वापरले गेले नाही तर त्यामुळे फॅटी लिव्हर निर्माण होते.

काही शास्त्रज्ञांच्या मते अधिक एफ्सीएस खाल्ल्याने पॅनक्रियाचा कॅन्सर होतो. म्हणूनच अमेरिकेत आता ठराविक प्रमाणातच HFCS खावे असा प्रचार केला जातोय.

**कॉर्न फ्लेक्स – हेल्दी ब्रेकफास्ट ?**

मुळात ब्रेकफास्ट ही संकल्पना भारतीय नाही. आयुर्वेदात थंडीचे दिवस वगळता इतर ऋतूत न्याहरीचा आग्रह धरलेला नाही. साधारण ९० च्या दशकापासून आपल्याकडे हेल्दी ब्रेकफास्टच्या नावाखाली कॉर्न फ्लेक्सचा प्रचार सुरु झाला.

मुळात अमेरिकेत मका गाय आणि डुकरांचे वजन लवकर वाढावे म्हणून खायला देण्यात येतो.

जो मका खाऊन डुकराचे वजन वाढते तो खाऊन माणसांचे वजन कसे कमी होईल? पण टी.व्ही.वर एखाद्या हिरोईनने ॲड केली की आपण लगेच त्याच्यावर उड्या टाकतो.

कॉर्न फ्लेक्समध्ये मोठ्या प्रमाणात एफ्सीएस असते. एखादा पदार्थ खाल्ल्याने रक्तातील साखर किती वाढते हे ठरवणाऱ्या एककाला 'ग्लायसेमिक इंडेक्स' म्हणतात.

तांदळाचा ग्लायसेमिक इंडेक्स ६० आहे म्हणून भाताने डायबेटीस होतो असा प्रचार केला जातो. पण कॉर्न फ्लेक्सचा ग्लायसेमिक इंडेक्स तब्बल ८१ आहे. पण तरीही तो हेल्दी ब्रेकफास्ट हे कसे काय?

शिवाय एका बाऊल कॉर्न फ्लेक्समध्ये एका पॅकेट वेफर्सपेक्षा जास्त मीठ असते. कॉर्न फ्लेक्स दुधातून खाल्ले जातात दुध आणि मीठ असलेला पदार्थ एकत्र खाऊ नये असे आयुर्वेद सांगतो.

**लेखक : डॉ. पुष्कर पुरुषोत्तम वाघ**
**एम.डी. 'आयुर्वेद'**

# मिरा रोडमध्ये हुक्का पार्लरवर छापा

**ठाणे - मिरा रोड पूर्वेकडील एका हुक्का पार्लरवर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला असून मानवी जीवन धोक्यात येईल अशा पद्धतीने हुक्का पार्लर चालवले जात होते. पोलिसांनी पार्लरच्या व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत पोलिसांनी काही साहित्य जप्त केले आहे.**



मिरा भाईंदर रोडलगतील एका इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावर हुक्का पार्लर चालवले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी तत्काळ हुक्का पार्लरवर धडक दिली. याठिकाणी दोन महिला आणि दोन पुरुष बसलेले होते. तसेच टेबलावर एक हुक्का पेटलेल्या स्थितीत पोलिसांना दिसून आला. हा हुक्का जप्त करत पार्लरची झडती घेत असताना एका दहा-बाय दहाच्या खोलीत कोळशाची मोठी शेगडी चालू होती. तसेच अडगळीच्या जागेत फ्रिज आणि इतर साहित्य ठेवण्यात आले होते. शेगडीवर हुक्का पेटत ठेवल्याने आग लागून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी तत्काळ शेगडीवरील पेटलेले कोळसा आणि हुक्का विझवला. पार्लरमधील पूर्व बाजूस प्रवेशद्वार असून त्या व्यतिरिक्त बाहेर जाण्याचा कोणताही मार्ग नसल्याचे या कारवाईतून समोर आले आहे. आणखीन एक गंभीर बाब म्हणजे पार्लरमध्ये आगप्रतिबंधक उपाययोजनाही नसल्याचे आढळून आले. याशिवाय हुक्का पार्लरमध्ये ये-जा करण्यासाठी एकच अरुंद जिना असून ज्या इमारतीमध्ये हुक्का पार्लर आहे ती इमारत व्यावसायिक आहे. इमारतीमध्ये आगीची घटना घडल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. यावेळी हुक्का पार्लरमध्ये व्यवस्थापक होता. त्याच्याकडे हुक्का पार्लरचा मालक तसेच परवान्याविषयी विचारपूस केली. मात्र त्याने उडवाउडवीची उत्तरे देत कोणत्याही प्रकारे परवाने दाखवले नाहीत. त्यामुळे पोलिसांनी व्यवस्थापकाला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध पोलिसांनीच तक्रार केली आहे. मानवी जीवन धोक्यात आणण्याचे कृत्य केल्याचे ठपका आरोपींवर ठेवण्यात आला आहे.

# पालघरमधील तब्बल १२ हजार वाहनांवर दंडात्मक कारवाईचा बडगा

***पालघर : महामार्गावर बेदरकारपणे वाहने हाकणाऱ्या वाहन चालकांवर नियंत्रण आणून अपघाती मृत्यू रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेत तीन अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहने दाखल झाली आहेत. या वाहनातील लेझरस्पीड गन, टिंट मीटर आणि ब्रेथ ॲनॅलायझरच्या माध्यमातून वाहनांवर करडी नजर ठेवली जात असून आतापर्यत १२ हजार वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.***

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अपघातांमध्ये अलीकडे वाढ होत असून प्रवाशांचा या अपघातादरम्यान मृत्यू ओढवतो. बेदरकार तसेच सुसाट वाहनांमुळे होणाड्या अपघातांमधील मृतांचा वयोगट हा प्रामुख्याने १७ ते ४५ असा असतो. ऐन तारुण्यात ओढवणाड्या या मृत्यूमुळे अनेक कुटुंबे दु:खाच्या खाईत लोटली जात असल्याचे सहा. पोलीस निरीक्षक दिंडे यांनी सांगितले.

विविध उपाय योजूनही अपघातावर नियंत्रण मिळविणे कठीण होत असल्याने हे नियंत्रण आणि जनजागृती करण्यासाठी शासनाकडून राज्यातील महामार्ग पोलीस मदत केंद्र आणि जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेत अत्याधुनिक यंत्र सामुग्रीने सुसज्ज असे इंटरसेप्टर वाहन पुरविण्यात आले आहे. जिल्ह्यातील मनोर, चारोटी आणि चिंचोटी येथे ही वाहने सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत कार्यरत राहणार आहेत. मोठ्या अवजड वाहनाने ६० किमी. प्रतितास वेगाने आपली वाहने तिसड्या



लेनमधून चालवायची आहेत. त्यांनी आपली लेन सोडून वाहने चालविल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होणार आहे तर गाड्या ८० कि.मी. प्रति तास व मोटारसायकल ६० कि.मी. वेगाने जाणार असून वेग मर्यादेचे उल्लंघन केल्यास तत्काळ कारवाई होणार असल्याचे उपनिरीक्षक एन.एस.चौगुले यांनी सांगितले. अशी तीन वाहने जिल्हा वाहतूक शाखेत दाखल झाली आहेत.

या वाहनात लेझरस्पीड गन असून त्याद्वारे वाहनांचा वेग मोजता येणार आहे. सदर लेझरस्पीड गनचा वापर करून आणि त्यातील कॅमड्ड्याच्याद्वारे वेग ठरविणे शक्य होणार आहे. वेग मर्यादेचे उल्लंघन करणाड्या वाहनांवर तत्काळ कारवाई केली जाईल. त्यासाठी वाहन मालकाच्या मोबाइलवर तत्काळ संदेश जाईल. सदर यंत्रणा इंटरनेटद्वारे कार्यान्वित राहणार आहे. यासोबतच या वाहनात टिंट मीटर उपलब्ध आहे. काचांवरील काळ्या रंगाच्या फिल्मची तपासणी याद्वारे केली जाईल. काळ्या रंगाची फिल्म ८० टिंटपेक्षा अधिक असता कामा नये, काळी फिल्म सदोष असल्याचे या उपकरणाद्वारे आढळून आल्यास दंड होऊ शकतो. मोटरवाहन कायद्यानुसार लेन कटिंग २०० रुपये, वेग मर्यादा उल्लंघन १ हजार तर काळ्या काचेसाठी २ हजार दंड आकारणी करण्यात येणार आहे. यात ब्रेथ ॲनालायझर उपकरण राहणार असून मद्यप्राशन करणाड्या वाहन चालकाची तत्काळ तपासणी केली जाईल. सदर उपकरणाद्वारे वेळीच प्रिंट काढून माहिती प्राप्त होणार आहे.

# नालासोपाऱ्यात रिक्षावाल्यांची दादागिरी; पाच प्रवाशांची वाहतूक



**नालासोपारा :** शहरातील रिक्षावाले मोठ्या प्रमाणात नियमांचे उल्लंघन करत असून रिक्षातून ३ प्रवासी नेण्याचा नियम असतानाही ४ ते ५ प्रवासी नेतात. वाहतूक पोलिसांचेही या गोष्टीकडे दुर्लक्ष होताना दिसते आहे. त्यामुळे नियमापेक्षा जास्त प्रवासी नेणाड्या रिक्षाचालकांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. याबाबत तातडीने काही ना काही कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

नालासोपारा पश्चिमेकडील तसेच पूर्वेकडील पुलाखाली मोठ्या प्रमाणात रिक्षा उभ्या असल्याने नागरिकांना तसेच वाहतुकीला मोठा त्रास होतो. वास्तविक, येथे वाहतूक पोलिसाची गरज असतानाही कोणीही पोलीस नसतो. त्यामुळेच रात्रीच्या वेळी बॅच, परमिट नसलेल्या अनिधकृत रिक्षांचा मोठ्या प्रमाणात वावर येथे दिसतो.

नालासोपारा पूर्वेकडे पुलाखाली अनधिकृत रिक्षाचालकांचा सुळसुळाट असून रिक्षा बिनधास्त रस्त्यावर आडव्या, उभ्या करून कोंडी करत असतात. यामुळे नागरिकांना चालण्यास त्रास होत आहे. तर नालासोपारा पश्चिमेकडील एसटी डेपो, हनुमान नगर, छेडा नगर, शांती पार्क, श्री प्रस्था येथे जाणाड्या प्रवाशांना हे रिक्षावाले रात्रीच्या वेळी मजबुरीचा गैरफायदा घेत अक्षरश: लुटतात. पूर्वेकडील रिक्षावालेही प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा पैसे घेतात. या रिक्षावाल्यांवर वाहतूक पोलिसांचा वचक नसल्याने त्यांचे फावते आहे. काही रिक्षावाले अनधिकृत आहेत. त्यांच्याकडे परवाना, परमिट, आदी पूरक कागदपत्रे नसूनही ते शहरात रिक्षा चालवतात.

# कल्याणमधील 'म्हाडा'ची घरे लाभार्थीसाठी सज्ज

**कल्याण :-** कल्याण तालुक्यातील खोणी, शिरढोण गावांच्या हद्दीत 'म्हाडा'तर्फे बांधण्यात येणारी २६ हजार १९३ घरे उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. 'प्रधानमंत्री आवास' योजनेच्या माध्यमातून बांधण्यात येणारी ही घरे पुढील वर्षांपर्यंत लाभार्थ्यांना मिळणार आहेत. मागील दीड वर्षांपासून इमारती उभारण्याचे काम सुरू आहे.



कल्याण तालुक्यातील खोणी गावात सव्हे क्रमांक १६२ वर चौदा माळ्याच्या इमारती उभारण्यात येणार आहेत. येथील गृह प्रकल्पात आर्थिक दुर्बल घटकांसाठी ७ हजार १५० सदनिका, अल्प उत्पन्न गटासाठी १ हजार ६६० सदनिका बांधण्यात येणार आहेत. या गृह प्रकल्पासाठी ८७६ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. शिरढोणमधील सव्हे क्रमांक ८६, ९५ या आरक्षित जमिनींवर सात माळ्यांच्या इमारती उभारण्यात येणार आहेत. दुर्बल घटकांसाठी १३ हजार ६०८, अल्प उत्पन्न गटासाठी २ हजार ९४० सदनिका बांधण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी १२७ कोटी ३१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कल्याण पश्चिमेतील नागरीकरण झालेल्या बारावे गावाच्या हद्दीत गट क्रमांक २७ या आरक्षित जमिनीवर आर्थिक दुर्बल घटकांसाठी (इकॉनॉमिक वीकर सेक्शन) ८३४ सदनिका बांधण्यात येणार आहेत. वाहनतळासह चौदा माळ्यांच्या इमारती बारावेच्या जागेत उभारण्यात येणार आहेत. या गृह प्रकल्पासाठी ७९ कोटी ७९ लाख रुपये कोकण हाऊसिंग बोर्डाने निश्चित केले आहेत. कल्याण शहराच्या वेशीवर नवीन कल्याण म्हणून विकसित झालेल्या परिसरात बारावे गाव आहे. या भागात उच्च मध्यमवर्गीय रहिवासी अधिक संख्येने राहतात. या वस्तीच्या परिसरात सर्वसामान्यांसाठी हा गृह प्रकल्प आकाराला येणार आहे.

कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शिरढोण, खोणी येथील घरांची सोडत यापूर्वीच काढण्यात आली आहे. इमारत बांधकामे पूर्ण झाली त्याप्रमाणे सोडती काढण्यात येत आहेत. शिरढोण, खोणी येथील बहुतांशी प्रकल्प पूर्ण झाला आहे. लवकरच म्हाडाची कोकण गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाची घरांची सोडत निघण्याची शक्यता आहे.

# मीरा-भाईंदर शहरातील झाडांना केबल तारांचा विळखा

मीरा-भाईंदर शहरातील झाडांवर महापालिकेचे लक्ष नसल्याने केबल आणि इंटरनेटधारकांनी आपल्या फायद्यासाठी झाडांना इजा पोहोचवण्याचे काम सुरू केले आहे. मीरा-भाईंदर शहरामध्ये अनेक ठिकणी झाडांवर टीव्ही केबल आणि इंटरनेट तारांचा विळखा बसला आहे. यामुळे या झाडांना धोका निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याने पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे.



मीरा-भाईंदर महापालिकेकडून झाडांचे संवर्धन व जतन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले असतानाही या आदेशाचे उल्लंघन केले जात आहे. अनेक झाडांना टीव्ही केबलचा विळखा बसला आहे. अनेक दुकानदार, हॉटेल व बार व्यवसायिक यांनी सर्रास सार्वजनिक पालिकेच्या झाडांचा वापर विद्युत रोषणाईसाठी चालवला आहे. स्वत:च्या दुकान- हॉटेलाच्या सौंदर्यीकरण आणि जाहिरातबाजीसाठी, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी झाडांवर बेकायदा विद्युत तोरणे लावली जात आहेत. यामुळे झाडांचे आयुष्यमान कमी होत असल्याचे पर्यावरणप्रेमींनी सांगितले.

मीरा-भाईंदर महानगरपालिका परिसरातील अनधिकृत केबलवर कारवाई करण्यासाठी जानेवारी महिन्यात महासभेत ठराव मंजूर करण्यात आला होता. परंतु अद्यापही त्यावर कारवाई केली जात नसल्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत असल्याचे समोर आले आहे. शहरातील अनेक राजकीय नेत्यांचा केबल व्यवसाय असल्यामुळे राजकीय दबावामुळे कारवाई केली जात नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

# ठाकरे सरकार ५ वर्ष टिकणार

## भाजप खासदाराच्या दाव्याने सर्वांच्याच भुवया उचांवल्या!

**पुणे-** महाराष्ट्रात शिवसेनेनं काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत जात ऐतिहासिक आघाडीची सत्ता स्थापन केली आहे. मात्र ही आघाडी टिकणार नाही, सरकार पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण करू शकणार नाही, असा दावा भाजपच्या अनेक नेत्यांकडून करण्यात येत आहे. मात्र आता



भाजपचे सहयोगी खासदार संजय काकडे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या सरकारबद्दल केलेल्या एका वक्तव्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात भेट झाली, गप्पा झाल्या. हे सरकार पाच वर्ष टिकेल, ते टिकलं पाहिजे,' असं खासदार संजय काकडे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे एकीकडे भाजपचे नेते हे सरकार किती काळ टिकेल, असं म्हणत सरकारबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करत असताना संजय काकडे यांनी मात्र सरकार टिकावं, अशी इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस या आघाडीच्या सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू होत्या. मात्र अजित पवार यांनी राजकीय भूकंप घडवत भाजपला पाठिंबा दिला. तसंच उपमुख्यमंत्रिपदाची शपथही घेतली. मात्र त्यानंतर अजित पवार यांचं बंड शांत झालं आणि त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. मात्र नंतर स्थापन झालेल्या महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये अजित पवार यांचा अजूनही मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेला नाही.

# विखे पाटलांसह कोणी स्वगृही परतण्यास उत्सुक असेल तर 'वेट अ‍ॅण्ड वॉच'

**अहमदनगर-** विधानसभा निवडणुकीच्या आधी राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. आता मात्र विखे पाटील यांच्यासह कोणी स्वगृही परतण्यास उत्सुक असेल तर 'वेट अ‍ॅण्ड वॉच', असे वक्तव्य काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ठाकरे मंत्रिमंडळातील मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. राधाकृष्ण विखेंबाबत थेट त्यांना विचारा की ते अस्वस्थ आहेत का, असा प्रतिसवालही थोरातांनी केला आहे. तसेच जिल्ह्याच्या आणि राज्याच्या काँग्रेसच्या किल्या आपल्याकडे असल्याचेही सूचित केले. पक्ष सोडून गेलेल्यांचा निर्णय नवनेतृत्त्वाकडे गेला असल्याचेही थोरातांनी सांगितले.

बाळासाहेब थोरात हे अहमदनगरात बोलत होते. तेलंगणाची राजधानी हैदराबादमध्ये डॉक्टर तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणातील चारही आरोपींचा शुक्रवारी एन्काउंटर करण्यात आला. त्यावर बाळासाहेब थोरात यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, बलात्कारासारखे खटले फास्ट ट्रॅकवर चालवून



त्वरित निर्णय होणे गरजेचे आहे. नराधमांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे. कायद्यात त्रुटी असतील तर राष्ट्रीय पातळीवर निर्णय घ्यायला हवेत, असे मत बाळासाहेब थोरात यांनी यावेळी व्यक्त केलेय गरज असल्यास कायद्यात बदल करा, अशी आग्रही मागणी थोरात यांनी केली आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री सुभाष देसाई आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना अखेर शासकीय निवासस्थान मिळाले आहे. सुभाष देसाई यांना माजी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा 'शिवनेरी' तर दिवाकर रावते यांचा 'मेघदूत' बंगला बाळासाहेब थोरात यांना देण्यात आला आहे. काही दिवस आधी शपथ घेतलेले मंत्री यांना शासकीय बंगला वाटप झाले होते. आता देसाई आणि थोरात यांना ही शासकीय बंगला वाटप करण्यात आला आहे. मात्र, सर्वच मंत्र्यांना खातेवाटपाची प्रतिक्षा आहे.

दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या राजकीय स्थितीमुळे ऐतिहासिक महाराष्ट्र विकास आघाडीचा उदय झाला.

# GSTमध्ये मोठा बदल झाल्यास कपडे आणि जेवण महागणार

## केंद्राला होईल १ हजार कोटींचा फायदा

**नवी दिल्ली-** GST च्या वसुलीत घट आल्याने सरकार आता दुसऱ्या पर्यायांचा विचार करतंय. GST पॅनल महसुलात वाढ करण्यासाठी काही निर्णय घेणार आहे. GST चा टॅक्स स्लॅब एक टक्क्याने वाढवून तो ६ टक्के करण्याची शक्यता आहे.

GST स्लॅबमध्ये बदल झाला तर महसुलात १ हजार कोटींची वाढ होईल. या अहवालात म्हटलं आहे की, GST पॅनल या महिन्यातच राज्यांचं प्रशासन आणि अधिकाऱ्यांशी बातचीत करण्याची शक्यता आहे. जीएसटी स्लॅबमध्ये चार स्लॅब आहेत. यामध्ये वेगवेगळ्या वस्तुंवर लावण्यात येणाऱ्या ५, १२, १८ आणि २८ टक्के टॅक्स स्लॅबचा समावेश आहे. पाच टक्के जीएसटी गरजेच्या वस्तूंवर लावला जातो. यामध्ये खाण्याचे साहित्य, कपडे इत्यादींचा समावेश आहे. ज्यावर जीएसटी लावला जातो त्यावर संपूर्ण टॅक्सच्या पाच टक्के भाग वसूल केला जातो. VAT अंतर्गत येणाऱ्या वस्तूंचा समावेश उएऊ मध्ये केला जाईल. याशिवाय सिगरेट, कोल्ड ड्रिंक्स वर लागणारा सेस वाढवण्याचा विचारही सरकार करतंय. ज्या वस्तूंवर GST लावण्यात आला नव्हता त्याही वस्तू GST च्या चौकटीत आणल्या जाणार आहेत. सध्याच्या या पुनर्रचनेत



ऑटो सेक्टरचा समावेश करण्यात आलेला नाही. पण सिगरेट आणि कोल्ड ड्रिंक्स या वस्तूंच्या किंमतीत वाढ होऊ शकते. GST करप्रणालीत सुधारणा करण्याच्या दिशेने सरकारने पावले उचलली आहेत. GST कौन्सिलने राज्य सरकारांशी याबाबत चर्चा सुरु केली आहे. जीएसटी फेरआढाव्याबाबत कौन्सिलने पत्र पाठवले असून त्यावर राज्य सरकारांना प्रतिसाद देण्यास सांगितलं आहे.

# ६,१४६ कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देण्याची घाई का?, मागील सरकारचा निर्णय

**मुंबई-** भाजप सरकारच्या काळात जलसंपदा विभागाने ६,१४६ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता देताना व मंत्रिमंडळ बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता मिळण्याची वाट न पाहता, शासन आदेश काढण्याच्या सूचना कशा दिल्या? ईपीसीची (व्यय अग्र समिती) मान्यता न घेताच हे का करण्यात आले? कोणत्याही प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) देतानाची आजवरची जी ठरलेली पद्धत आहे, ती यावेळी का पाळण्यात आली नाही? असे प्रश्न मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीत उपस्थित करण्यात आले.

अजित पवार यांनी मंत्रिपदाच्या काळात जलसंपदाच्या प्रकल्पांना मान्यता देताना ठरवून दिलेल्या पद्धती न अवलंबल्यामुळे जनमंच संस्थेने याचिका दाखल केली होती, पण तशाच पद्धतीचे काम भाजप सरकारने जाता-जाता केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जो न्याय अजित पवार यांना, तोच न्याय भाजपच्या मंत्रिमंडळाला लावला जाणार की, जलसंपदा विभागाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाणार, असा सवाल एका ज्येष्ठ मंत्र्याने केला आहे. या सर्व प्रकरणांबाबतची कागदपत्रे मंत्रालयात पाठविण्याचे आदेश दिल्याने सर्व फायली संबंधितांना पाठविल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जळगाव तालुक्यातील शेळगाव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या ९६८.९७ कोटी रुपयांच्या खर्चास सुप्रमा देण्यात आली. मात्र, आधीच बॅरेजच्या दरवाज्याच्या कामाबद्दल तांत्रिक मुद्यांवर गंभीर स्वरूपाच्या



तक्रारी असताना आणि त्यांचे निवारण न करताच मंत्रिमंडळाची नव्या कामासाठी मान्यता कशी घेतली गेली, असे प्रश्न बैठकीत मंत्र्यांनी उपस्थित केले. तेव्हा याचीही सगळी माहिती समोर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याचे अधिकाड्ड्यांनी स्पष्ट केले. भातसा पाटबंधारे (ता. शहापूर जि. ठाणे) प्रकल्पासाठी १४९१.९५ कोटी रुपये खर्चास सहाव्या वेळी सुप्रमा देण्यात आली आहे. ती मान्यता देताना पाणी उपलब्ध आहे की नाही, हे न तपासण्यातच आले नाही. अन्य प्रकल्पांच्या सुप्रमासाठी वर्षानुवर्षे फाइल हलत नाही. मात्र, या प्रकल्पांना एवढी गती का दिली गेली? असेही सवाल मंत्र्यांनी केले आहेत. कुकडी प्रकल्पाची १० वर्षे, टेंभूची ६ ते ७ वर्षे तर विदर्भातील अनेक प्रकल्पांच्या सुप्रमाची फाइल दोन-दोन वर्षे फिरत राहिली होती. मग याच प्रकल्पांच्या फायली वेगाने कशी मान्य झाल्या, असे सवालही या बैठकीत मंत्र्यांनी केल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले.

कोकणातील कोंढाणा प्रकल्पात सुनील तटकरे यांनी एक दिवसात सगळ्या मंजुड्ड्या घेतल्याने, सध्या प्रकरण न्यायालयामध्ये असताना भातसाच्या फाइलचा मंत्रालयीन प्रवास किती वेगाने झाला याची तारीखवार माहिती समोर ठेवा, असेही सांगण्यात आले आहे.


# सरकारकडून दिलासा न मिळाल्यास व्होडाफोन आयडिया बंद होणार

**नवी दिल्ली-** व्होडाफोन-आयडियाचा वाढता तोटा कंपनीला कुलूप लावण्याच्या दिशेने घेऊन जात आहे. कंपनीचे अध्यक्ष कुमारमंगलम बिर्लांनी शुक्रवारी सांगितले की, मागणी केल्याप्रमाणे केंद्र सरकारककडून दिलासा मिळाला नाही तर कंपनी बंद होऊ शकते. दूरसंचार कंपन्यांवरील कर्जाचा बोजा इतका वाढला आहे की कंपनी चालवणे मुश्कील झाले आहे. या क्षेत्राशी संबंधित कंपन्यांच्या परिस्थितीचा अंदाज यावरून लावता येऊ शकतो की, व्होडाफोन- आयडियाचे अध्यक्ष कुमारमंगलम बिर्ला मदत मिळाली नाही तर कंपनी बद होऊ शकते असे सांगतात. कंपनी आणखी जास्त पैसे गुंतवू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. हिंदुस्तान टाइम्स लीडरशिप समिटमध्ये बोलताना ते म्हणाले, जर सरकारकडून दिलासा मिळाला नाही तर नाइलाजाने आम्हाला आमचे दुकान (व्होडाफोन-आयडिया) बंद करावे लागेल.

# बाळासाहेबांच्या स्मारकासाठी ५ हजार झाडांची कत्तल होणार; उद्धव ठाकरे काय भूमिका घेणार?

**मुंबई-** आरेमधील मेट्रोच्या कारशेडसाठी तोडण्यात आलेल्या झाडांना शिवसेनेनं मोठा विरोध केला होता. त्यातच आता औरंगाबादमध्ये होणाऱ्या शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी तब्बल ५ हजार झाडांची कत्तल केली जाणार आहे. प्रियदर्शनी उद्यान परिसरातील झाडं कापली जात असताना मात्र शिवसेनेकडून मौन बाळगण्यात आलं आहे. विशेष म्हणजे औरंगाबाद महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता आहे. आरेमधील झाडांच्या कत्तलीला शिवसेनेनं विरोध केला असतानाच तोच न्याय औरंगाबादमधील प्रियदर्शनी उद्यानाला मिळणार का असा सवाल आता पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे.

प्रियदर्शनी उद्यानात ७० पेक्षा अधिक प्रजातींचे पक्षी, ४० प्रकारची फुलपाखरे आणि अन्य जीव आढळतात. या उद्यानाची जागा यापूर्वी सिडकोच्या ताब्यात होती. परंतु कालांतरानं ती मनपाच्या ताब्यात देण्यात आली. त्यानंतर या उद्यानातील ४४३ झाडं तोडण्यात आली आहेत. याच ठिकाणी बाळासाहेब ठाकरे यांचं स्मारक उभारण्यात येणार आहे.



या उद्यानात हे स्मारक उभारायचे असल्यास त्यासाठी ५ हजार झाडांची कत्ताल करावी लागणार असल्याचं मत पर्यावरण तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आलं आहे. तसंच या विरोधात ग्रीन औरंगाबाद फोरमच्या माध्यमातूनही आंदोलन उभारण्यात आलं आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी एकूण ६४ कोटी रूपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यात स्मारक उभारण्यासाठी १ हजार १३५ चौरस मीटर, फुड पार्कसाठी २ हजार २२० मीटर, म्युझिअमसाठी २ हजार ६०० चौरस मीटर तर ३ हजार ६९० चौरस मीटर उघडी जागा असणार आहे. आता यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे काय भूमिका घेणार असा सवाल सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

# पुढील आठवड्यात खातेवाटप, मंत्रिमंडळ विस्ताराची शक्यता



**मुंबई-** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची आणि राष्ट्रवादी तसेच काँग्रेसच्या प्रत्येकी तीन मंत्र्यांनी शपथ घेऊन नऊ दिवस झाले तरी खातेवाटपाचा तिढा कायम असल्याने शुक्रवारी शरद पवार आणि मुख्यमंत्री ठाकरे यांनी खातेवाटपासह मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा केली. दरम्यान, पुढील आठवड्यात हा तिढा सुटण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

महाराष्ट्र विकास आघाडी सत्तेवर आली खरी, परंतु महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवण्याच्या कुरघोडीवरून खातेवाटप होत नव्हते. शपथ घेतलेल्या मंत्र्यांनाही काय काम करावे हे समजत नव्हते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी खातेवाटप व नव्या मंत्र्यांच्या नावांबाबत सोनिया गांधी यांच्याशी चर्चा केली होती. संजय राऊत व शरद पवार यांच्यातही दिल्लीत बैठक झाली होती. मात्र, कोणताही निर्णय होत नव्हता. अखेर तिढा लवकर सुटावा म्हणून शुक्रवारी ही बैठक झाली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी पुण्याला जायचे असल्याने तासभर बैठक घेऊन ते निघून गेले. त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक सुरू होती. पुन्हा एकदा अशीच बैठक होऊ शकते. शिवाय अजित पवार यांना उपमुख्यमंत्रिपद दिले जाण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# हैदराबादमधील आरोपींप्रमाणेच शिक्षा द्या; उन्नाव पीडितेच्या वडिलांची मागणी

**तेलंगना-** हैदराबाद बलात्कार प्रकरणातील आरोपींप्रमाणे माझ्या मुलीच्या आरोपींना शिक्षा द्या, अशी मागणी उन्नाव बलात्कार पीडितीच्या वडिलांनी केली आहे. उन्नाव येथील बलात्कार पीडितेचा शुक्रवारी दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात मृत्यू झाला. बलात्कार पीडित महिलेला गुरुवारी पहाटे आरोपींनी जाळण्याचा प्रयत्न केला होता, त्यात ती ९० टक्क्यांहून अधिक भाजल्यानंतर तिला दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रात्री ११.४० च्या सुमारास सफदरजंग रुग्णालयात तिचा मृत्यू झाला. कार्डिअॅक अरेस्टमुळे तिचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात आली. यानंतर प्रतिक्रिया देताना तिच्या वडिलांनी हैदराबादमधील आरोपीप्रमाणेच आपल्या मुलीच्या आरोपींना शिक्षा देण्याची मागणी केली. दरम्यान, आपल्याला मुलीच्या मृत्यूची सुचना देण्यात आली नव्हती, असंही तिच्या वडिलांकडून सांगमअयात आलं. तसंच आरोपींना हैदराबादमधील आरोपींप्रमाणेच शिक्षा देणअयात यावी किंवा त्यांना लवकरात लवकर फाशी देण्यात यावी, अशी



मागणी त्यांनी यावेळी केली. एका हिंदी वृत्तवाहिनीला त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली. आरोपींना शिक्षा मिळाल्यानंतरच आपल्या मुलीच्या आत्म्याला शांती लाभेल, असंही ते म्हणाले.

दरम्यान, बलात्काराच्या घटनेनंतर संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. तसंच मारहाणदेखील करण्यात आली असल्याची माहिती पीडितेच्या कुटुंबीयांनी दिली. आपल्याला पैसे किंवा अन्य कोणत्याही गोष्टीची लालसा नाही. परंतु या प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर शिक्षा देऊन न्याय देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी सरकारकडे केली आहे.

तिच्यावर गेल्यावर्षी बलात्कार करणाऱ्या दोन आरोपींपैकी एकाला दहा दिवसांपूर्वी जामीन मिळाला होता. तर या प्रकरणातील दुसरा आरोपी फरार आहे. गुरुवारी सकाळी पाच जणांनी तिच्यावर हल्ला करून तिला पेटवून दिलं होतं. त्यानंतर तिला जखमी अवस्थेत लखनौ येथे आणि नंतर तेथून दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आलं. दिल्ली वाहतूक पोलिसांनी तिला विमानतळावरून तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी विनाअडथळा हरित मार्गिका उपलब्ध करून दिली होती. परंतु शुक्रवारी रात्री पीडितेनं अखेरचा श्वास घेतला.

# हैदराबाद पोलिसांवर 'सोशल' कौतुकवर्षाव

**नाशिक -** हैदराबाद येथील महिला डॉक्टरवरील बलात्कार व निर्घृण हत्या प्रकरणातील चारही आरोपी पोलिस एन्काउंटरमध्ये मारले गेल्याचे समजातच, नेटिझन्सनी हॅशटॅग हैदराबाद पोलिस वापरत कौतुकाचा वर्षाव केला. पोलिसांची कामगिरी अभिमानास्पद असून, न्याय मिळाल्याच्या पोस्ट अपलोड करण्यात आल्या. परंतु, दुसरीकडे अशा प्रकारे कारवाई झाल्यास न्यायव्यवस्था धोक्यात येऊ शकते, असेही मत काही जणांनी मांडले.

हैदराबाद बलात्कार प्रकरणातील आरोपी पळून जात असताना, पोलिसांनी त्यांच्या एन्काउंटर केल्याचे समजताच हैदराबादचे 'सिंघम', अशा पोस्ट अपलोड होण्यास सुरुवात झाली. 'जस्टिस फॉर दिशा', 'हैदराबाद पोलिस', 'हैदराबाद रेप केस' यासारखे अनेक हॅशटॅग वापरण्यात आले. हिंदी सिनेमातील छोट्या व्हिडिओ अपलोड करत, झालेल्या घटनेचे कौतुक नेटिझन्सनी केले. पोलिसांचे आभार मानन्यासह, पोलिसांना डोक्यावर घेऊन नाचत असल्याचे फोटो, व्हिडिओ शेअर करण्यात आले. फेसबुक, व्हॉटसअॅप, इन्स्टाग्रामसह सर्व सोशल मीडियावर एन्काउंटरबाबत प्रतिक्रिया उमटत होत्या.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार
मानव कल्याणा साठी झुंज देणारी एक मेव बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
महा /२०७०/१५ ठाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० द्वारा नोंदणी
Email : socialrightsfoundation2015@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0230647

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)